# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
**Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र. १६८** **दिनांक २२/०६/२०२१**

**पर्यटन स्थळांबाबत पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये मनाई आदेश लागू**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात मान्सून कालावधीत मोठया संख्येने पर्यटक हे धबधबे, तलाव, धरणे व समुद्र किनारी येत असतात व त्याठिकाणी जिवीतहानी होण्याच्या घटना घडत असतात. सद्यस्थितीमध्ये आयुक्तालय कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता पावसाळयात मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात असलेले धबधबे, तलाव, धरणे व समुद्र किनारे इत्यादी पर्यटन ठिकाणी मोठया प्रमाणात पर्यटक पर्यटनासाठी आल्याने त्या ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी होण्याची व सामाजिक अंतर राखले न गेल्यास तेथे कोव्हिड-१९ चा संसर्ग व प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी पर्यटकांची सुरक्षितता अबाधित रहावी व कोणत्याही प्रकारची जिवीतहानी होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक आदेश लागू करणे गरजेचे होते. त्याकरिता श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२ ) अन्वये मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयातील सर्व धबधबे, तलाव, धरणे व समुद्र किनारे इत्यादी पर्यटन स्थळांच्या १ कि.मी. परिसरात दिनांक २२/०६/२०२१ रोजीचे ००.०० वाजे पासून ते दि.१८/०८/२०२१ रोजीचे २४.०० वाजे पर्यंत खालील बाबींकरिता प्रतिबंधात्मक आदेश लागू केलेले आहेत.

१. पावसामुळे वेगाने वाहना-या पाण्यात उतरणे, खोल पाण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे.
२. धबधब्याच्या उगम स्थानी जाणे अथवा पाण्याच्या प्रवाहाखाली बसणे.
३. पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे,धबधबे,द-यांचे कठडे, धोकादायक वळणे इत्यादी ठिकाणी सेल्फी काढण्यास व कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे.
४. पावसामुळे निर्माण झालेले नैसर्गिक धबधब्यांचे परिसरामध्ये मद्यपान करण्यास किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे,मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे व उघडयावर मद्य सेवन करणे.
५. वाहतूकीचे रस्ते तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबवणे.
६. वाहन अतिवेगाने चालविणे तसेच वाहतूकीस परिणाम होईल अशा प्रकारे वाहन चालविणे.
७. वाहनांची ने-आण करताना बेदरकारपणे वाहन चालवून ईतर वाहनांना धोकादायक स्थितीत ओव्हरटेक करणे.
८. सार्वजनिक ठिकाणी खाद्यपदार्थ, कचरा, काचेच्या व प्लास्टीकच्या बाटल्या, थर्माकॉलचे व प्लास्टीकचे साहित्य उघडयावर इतरत्र फेकणे.

९. सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या महिलांची छेडछाड करणे, टिंगलटवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे, असभ्य व अश्लील हावभाव करणे, शेरेबाजी करणे अथवा लज्जा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करणे.

१०. सार्वजनिक ठिकाणी मोठया आवाजात संगीत यंत्रणा वाजविणे, डि.जे. सिस्टीम वाजविणे, गाडीमधील स्पिकर वाजवणे व त्यामुळे ध्वनी प्रदुषण करणे.

११. ज्या कृतीमुळे ध्वनी, वायू व जल प्रदुषण होईल अशी कोणतीही कृती करणे.

**सदर आदेशाचा कालावधी हा दिनांक २२/०६/२०२१ रोजीचे ००.०१ ते दिनांक १८/०८/२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत लागु राहतील.**

------ooooo------